# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.
दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६. ई-मेलः mercindia@mercindia.org.in

## जाहीर सूचना

### पुणे शहरातील भार नियमन शिथील करण्यासाठीचा खर्च हा रिलायेबिलीटी आकार म्हणून अतिरिक्त वसुलीस मंजुरी देण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) च्या प्रस्तावावर सूचना / अभिप्राय

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण), प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१, यांनी पुणे शहरातील भार नियमन शिथील करण्यासाठी महागडी वीज प्राप्त करून घेण्यासाठीचा खर्च, ३०० युनिट्सपेक्षा कमी वीज वापर करणारे निवासी ग्राहक वगळून, इतर सर्व ग्राहकांकडून रिलायेबिलीटी आकार म्हणून, वसूल करण्यासाठी ३१ डिसेंबर २००७ रोजी एक प्रस्ताव आयोगास सादर केला आहे. ही योजना एका वर्षासाठी लागू राहणार असल्याचे महावितरणने प्रस्तावात नमूद केले आहे. पुण्यातील भार नियमन शिथील करण्यासाठी  लागणारी सर्व वीज, पुण्यातील स्व-वापरासाठीच्या विद्युत निर्मिती प्रकल्पांकडे उपलब्ध असलेल्या अतिरिक्त विजेतून घेण्यात येईल, असे सीआयआय-पुणे मूळ मॉडेलमध्ये अभिप्रेत होते. सध्या विचाराधीन असलेल्या सुधारित प्रस्तावातील पहिल्या पर्यायात महावितरण कंपनीने असे नमूद केले आहे की, पुण्यातील विजेच्या मागणी-पुरवठ्यातील तूट कमी करण्यासाठी विद्युत निर्मिती प्रकल्पांकडील अतिरिक्त वीज पुरेशी नाही. त्यामुळे, विद्युत निर्मिती प्रकल्पांकडील विजेव्यतिरिक्त, महावितरण केवळ पुणे नागरी विभागाकरिता वीज खरेदी करार करून अतिरिक्त वीज प्राप्त करून घेईल. महावितरण कंपनीने दुस-या पर्यायाखाली असे प्रस्तावित केले आहे की विद्युत निर्मिती प्रकल्पांकडे उपलब्ध असलेली अतिरिक्त वीज महावितरण प्राप्त करून घेईल आणि विजेच्या उरलेल्या तुटवड्याकरिता पुणे नागरी विभागात भार नियमन पुनः सुरु करण्यात येईल.

२. त्याचप्रमाणे, स्व-वापरासाठीच्या प्रकल्पांतील निर्माण केलेली (म्हणजेच राज्याबाहेरील स्वतंत्र वीज निर्मात्यांकडील) अतिरिक्त वीज  ठाणे, भांडुप, मुलुंड या विभागाला, जादा अधिभार लावून, पुरवठा करण्यासाठी, ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन-TSSIA हाऊस, प्लॉट क्र. पी-२६, रोड १६/टी, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे ४०० ६०४ यांच्याकडून देखील, आयोगास २१ जानेवारी २००८ च्या पत्राद्वारे एक प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

३. (१) बारामती व्यापारी महासंघ लिमिटेड- जयहिन्द जन. स्टोअर्स, महावीर पेठ, बारामती ४१३ १०२, जि. पुणे यांच्याकडून दिनांक ५ डिसेंबर २००७ च्या पत्राद्वारे बारामती नगरातील भार नियमनाचा कालावधी कमी करण्यासाठी आणि (२) मुंबई विभागीय कॉंग्रेस कमिटी, दुकान क्र. ९, गाला नगर, जे. एन. रोड, मेहुल सिनेमाशेजारी, मुलुंड (प.), मुंबई, ४०० ०८० यांच्याकडून दिनांक १३ डिसेंबर २००७ च्या पत्राद्वारे उपलब्ध स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीतून, एकूण तांत्रिक व वाणिज्यिक तोटे १४ टक्क्यांपेक्षा

कमी असणा-या मुलुंड, भांडुप आणि कांजूरमार्ग या विभागात २४ तास खात्रीशीर अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी, सीआयआय-पुणे मॉडेलच्या धर्तीवर, असे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

४. महावितरणच्या प्रस्तावाच्या प्रती पुढील पत्त्यावर लेखी विनंती केल्यावर विनामूल्य मिळू शकतील- (१) सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (म.वि.ना.आ.), वर्ल्ड ट्रेड सेंटर, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई, ४०० ००५; (२) अधीक्षक अभियंता, (टीआरसी), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण), प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ आणि (३) महावितरण कंपनीची पुण्यातील मंडळ व विभागीय कार्यालये.

५. (१) ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचा प्रस्ताव (२) मेसर्स बारामती व्यापारी महासंघ लिमिटेडचा प्रस्ताव आणि (३) मुंबई विभागीय कॉंग्रेस कमिटीच्या प्रस्तावाच्या प्रती सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांच्याकडे उपरोक्त पत्त्यावर लेखी विनंती केल्यावर विनामूल्य मिळू शकतील.

६. वरील सर्व प्रस्ताव आयोगाच्या www.mercindia.org.in या वेबसाईटवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहेत.

७. वरील प्रस्तावांवरील लेखी सूचना/अभिप्राय (मराठी किंवा इंग्रजीत) आयोगाच्या कार्यालयास व्यक्तीश: किंवा पोस्टाने (चार प्रतींमध्ये) किंवा फॅक्स / ई-मेलव्दारे दि. २२ फेब्रुवारी २००८ पर्यंत पाठवाव्यात. सूचना/अभिप्राय पाठविणाऱ्याने आपले नांव, संपर्क पत्ता, इ-मेल पत्ता (असल्यास) नमूद करावे. लेखी सूचना/अभिप्राय ज्या प्रस्तावाशी संबंधित असेल त्याप्रमाणे त्याची एक प्रत वरील परिच्छेद १, २, ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या संबंधित अर्जदारांना पाठवावी. हे सूचना/अभिप्राय एखाद्या संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गातर्फे करण्यात येत असल्यास, तसेच त्या व्यक्तीस आयोगाने त्याचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी इच्छा असल्यास, त्यात तसा उल्लेख करण्यात यावा. अशा व्यक्तीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी खाली नमूद करण्यात आल्याप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सुनावणीच्या वेळी देण्यात येईल. या सुनावणीसाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**८. वरील सर्व प्रस्तावांवरील जाहीर सुनावणी सोमवार, दिनांक २५ फेब्रुवारी २००८ रोजी सकाळी ११.०० वा. विस्टा हॉल, ३० वा मजला, केन्द्र क्र. १, जागतिक व्यापार केन्द्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५ येथे घेण्यात येईल.**

सही /-
(प्र.बा. पाटील)
सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

दिनांक : ३० जानेवारी २००८
मुंबई